साप्ताहिक

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक - रमेश अ. शेळके | कार्य. संपादक - ॲड. चंद्रकांत गायकवाड | RNI NO. : MAHMAR /2010/36016

■ वर्ष ६ वे ■ अंक ३३ वा ■ सोमवार दि. १२ ते १८ सप्टेंबर २०१६ ■ किंमत - २ रुपये ■ पाने ४

## अनुदानाच्या मागणीचे अर्ज सुटसुटीत करावेत : मुख्यमंत्री

मुंबई : सामान्य तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठी राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या विविध अनुदानासाठीचे मागणी अर्ज सुटसुटीत करुन प्रक्रिया सुलभ करावी. तसेच कागदपत्रांची संख्याही मर्यादित ठेवावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मंत्रालयात ऑनलाईन लोकशाही दिन घेण्यात आला, त्यावेळी बुलढाणा येथील दत्तात्रय कोरे यांच्या तक्रारीवर सुनावणी करताना मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले. यावेळी ठाणे, नाशिक, अहमदनगर, पुणे, सांगली, सोलापूर, बीड, जालना, हिंगोली, बुलढाणा, यवतमाळ आणि गोंदिया येथील तक्रारदारांच्या तक्रारींवर चर्चा करण्यात आली. मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, पोलीस महासंचालक सतीश माथूर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बुलढाणा येथील श्री. कोरे यांनी अनुदानासाठी अर्ज केल्यानंतर अद्याप त्यावर कार्यवाही न झाल्याबाबत तक्रार केली होती. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले की, विविध योजनेचे लाभार्थी अनुदानासाठी अर्ज करीत असतात. मात्र हे अर्ज सुटसुटीत करुन त्याबाबतची प्रक्रिया सुलभ करावी. बऱ्याचदा कागदपत्रांअभावीदेखील अर्ज नामंजूर होतात, त्यामुळे आवश्यक तेवढीच कागदपत्रे मागविण्यात यावीत. अर्जाचे सुलभीकरण केल्यास प्रलंबित प्रकरणांची संख्यादेखील कमी होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

हिंगोली येथील रमेश आढळकर यांनी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार केली होती. मृत व्यक्ती तसेच वयोवृद्ध आणि अपंगांच्या नावावर या योजनेअंतर्गत अनुदान काढले असल्याचे श्री. आढळकर यांनी सांगितले. या प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

कृषी पंपांसाठीच्या वीजजोडणीची पेडपेंडींग प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढावीत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी सांगली येथील तक्रारदाराच्या तक्रारीवर सुनावणी करताना दिले.

## राज्यात कौटुंबिक न्यायालयामध्ये ३२ हजार प्रकरणे प्रलंबित

अमरावती : कौटुंबिक अडचणी सोडवण्यासाठी न्यायालयात धाव घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून राज्यात सद्यस्थितीत २५ कौटुंबिक न्यायालयांमध्ये तब्बल ३२ हजार ८५४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे वास्तव पुढे आले आहे. देशात सर्वाधिक ७६ कौटुंबिक न्यायालये उत्तर प्रदेशात आहेत. प्रलंबित प्रकरणांची संख्याही या राज्यात सर्वाधिक आहे. पण, इतर मोठ्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात न्यायालयांची संख्या कमी आणि प्रलंबित प्रकरणे अधिक, अशी स्थिती निर्माण झाली आहे. प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक देशात पाचवा आहे.



महिलांना त्यांचे हक्क मिळावेत, कौटुंबिक समस्या योग्य मार्गाने सोडवल्या जाव्यात, या हेतूने कौटुंबिक न्यायालये उभारण्यात येत आहेत. सध्या राज्यात अशी न्यायालये अस्तित्वात आहेत. पती-पतकीमधील वादानंतर न्यायालयात पोहचलेल्या उभयतांना प्रथम एकत्र आणण्याचा प्रयतक कौटुंबिक न्यायालयामार्फत केला जातो. कोणत्याही कुटूंबांचा पाया हा पती-पतकीच्या नात्यावर भक्कमपणे उभा असतो.

हेच नाते काही प्रसंगी किरकोळ कारणावरून डळमळीत होते. यातून टोकाचा निर्णय घेतल्याने कुटुंबांना न्यायालयाची पायरी चढावी लागते. वाढत्या लोकसंख्येसोबतच पती-पतकीच्या वादासंबंधी असंख्य प्रकरणे कौटुंबिक न्यायालयांमध्ये दाखल होण्याचे प्रमाण वाढले आहे. घटस्फोटांचे न्यायालय म्हणून कौटुंबिक न्यायालयांकडे बघितले जात असले, तरी प्रथम भांडण मिटवण्याचाच प्रयतक केला जातो. न्यायालयात विवाह समुदेशक हे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले आहे. विभक्त होण्यासाठी प्रकरण दाखल करणाऱ्या पती-पतकीला लग्न झाल्याचा दाखला, स्थानिक रहिवासी प्रमाणपत्र न्यायालयात सादर करावे लागते. पण, संबंधितांचा अर्ज दाखल झाल्यावर लगेच या प्रकरणाची सुनावणी सुरू होत नाही, तर उभयतांमधील वाद जाणून घेऊन समेट घडवून आणण्याचा प्रयतक केला जातो. अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायाधीश प्रकरण समझोत्यासाठी समुपदेशकाकडे वर्ग करतात.

समुपदेशनासाठी पती-पतकीला एकत्र बोलावले जाते. समुपदेशक तडजोडीचा मार्ग काढण्याचा प्रयतक करतात. कौटुंबिक कलहाची किंवा वादाची अनेक कारणे असतात. पती, पतकीच्या नातेवाईकांची नाहक ढवळाढवळ, वृथा अभिमान, पगाराच्या कारणावरून होणारावरून भांडणे, संपत्तीचा वाद यातून अनेक प्रकरणे उद्भवतात. पती-पतकी आणि त्यांचे नातेवाईक मुलांचा शस्त्र म्हणून वापर करतात. एका दिवसाच्या भेटीसाठी त्यांच्यात भांडणे होतात.

ही भांडणे विकोपाला जातात, त्यातून सावरणे कठीण होते. सुशिक्षित पती-पतकींमध्ये वादविवादाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. कौटुंबिक न्यायालयांमध्ये अपुऱ्या मनुष्यबळामुळे प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढली आहे. सरकारने त्यामुळे ४२ समुपदेशकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. सध्या कौटुंबिक न्यायालयात ४३ समुपदेशक आहेत. ही संख्या अपुरी असल्याने त्याचा परिणाम खटल्यांचा निपटारा करण्यावरही होत असतो.

सुवर्ण संधी ! सुवर्ण संधी !! सुवर्ण संधी !!!

कोकणातील निसर्गाच्या सानिध्यातील एक सुंदर प्रकल्प !
उत्तम भविष्यासाठी.... एकमेव पर्याय.... जमिनितील गुंतवणुक

0% व्याज

AIAO-BAR QMS ACCREDITED

निसर्गरम्य आणि प्रदुषण विरहित मंडणगड व महाड या कोकण परिसरात सर्व सामान्य जनतेसाठी परवडेल अशा त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि. यांच्यावतीने स्वत:च्या हक्काच्या जमिनीचे मालक व्हा !

व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि.

ISO 9001:2008

नवनिर्मित द ग्रीन स्टोन फार्म

पुणे स्टेशनपासून अंदाचे १६० किमी. अंतरावर रायगड, रत्नागिरी, हरिहरेश्वर बीज, मंडणगड या निसर्गरम्य परिसरात स्वस्त दराने व सुलभ हप्त्याने शेत जमिन, भव्य बंगलो, एन.ए. प्लॉट उपलब्ध आहे.

प्लाटॅची वैशिष्ट्ये

१) २० फुटी अंतर्गत रस्ते.
२) क्लिअर टायटल प्रॉपर्टी.
३) सुलभ हप्त्याची सुविधा.
४) मुंबई- गोवा एस. एच. १०० पासुन ४ कि. मी.
५) हरणे बीज ३५ कि. मी.
६) हरिहरेश्वर ४५ कि. मी.
७) मंडणगड एम.आय.डी.सी. पासुन १ कि.मी.
८) करंजवाडी रेल्वे स्टेशन ५ कि. मी.

ग्रीन स्टोन फार्म फेज-३

| | |
|---|---|
| ५,००० स्क्वे फू. (५ गुंठे) | रु. २,00000/- |
| बुकींग | रू. २५,000/- |
| उर्वरीत रक्कम | रु. १,७५,000/- |
| % व्याजदराने | रु. ४,000/- |
| ४४ महिने. | ४४ मसिक हप्ता |

रु. १० लाख प्रति एकर
काजु व आंब्याच्या लागवडीसह
बुकिंग रक्कम रु. १०,०००/-
अगाऊ रक्कम रू. ३ लाख
उर्वरीत रक्कम ५५ हप्त्यामध्ये प्रति हप्ता
रु. १५,०००/- तेही ०% व्याजदराने

ऑफर फक्त मर्यादित कालावधीसाठी
नियम व अटी लागु
ऑफिसवरून साईट पाहण्यासाठी गाडीची सोय

अधिक माहितीसाठी त्वरीत संपर्क साधा : व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि.
रजि. ऑ: मेरीविल्ला, स. नं. ७८/४/१, संत गजानन महाराज नगर,
रस्ता नं. २, भोसरी आळंदी राड, दिघी, पुणे.

ब्रॅच ऑफिस : ४३१/ अ, शॉप नं. १३,
सिध्दिविनायक केशर कॉम्प्लेक्स, सोमवार पेठ,
नरपतगिरी चौक, पुणे ११. फोन: ०२०-४१२३११२२

ब्रॅच ऑफिस : गणेशा मंदिरा शेजारी,
रोड नं. १०, गणेशनगर, बोपखेल,
पुणे-३१. फोन: ०२०-६५३१११२२.

संपर्क : रमेश शेळके : 8554891279

Website : www.visioncitylandmark.in, E-mail : visioncitylandmarkpvtltd@gmail.com

जाहिरातीचे कात्रण घेऊन बुकींग केल्यास १००० रुपयाची सुट मिळेल

# संपादकीय ...

## किडनीचा काळाबाजार

सध्या सरकारी रूग्णालयात किडनी प्रत्यारोपणास ६० हजारापर्यंत येणारा खर्च खासगी रूग्णालयात साडेतीन लाखांपासून पंधरा लाखांपर्यंत कसा जातो, याचे आश्चर्य वाटते.

सर्वच क्षेत्रांत नैतिक मूल्यांची घसरण होत चालली असताना वैद्यकीय क्षेत्रात नफेखोरीसाठी होणारी रूग्णांची फसवणूक आणि पिळवणूक नवीन राहिली नाही. मरणाच्या दारात उभ्या असलेल्या रूग्णाला शस्त्रक्रियेसाठी पैसे नाहीत म्हणून अडविण्याच्या घटना सर्वश्रुत आहेत. केवळ पैसे कमविण्यासाठी कार्यरत असलेली डॉक्टरांची साखळी सगळ्यांनाच ज्ञात आहे. रक्तदान, नेत्रदान, अवयवदान या नावाखाली दान या पवित्र शब्दाची विटंबना व्हावी असेही प्रकार सर्रास चालू असल्याचे आढळते. १३ ऑगस्ट हा अवयवदान दिन साजरा होत असतानाच मुंबईतल्या हिरानंदानी हॉस्पिटलमधील किडनी रॅकेट उघडकीस यावे हा विचित्र योगायोग. बदलत्या जीवनशैलीचा परिणाम म्हणून किडनी निकामी होण्याचे प्रमाण वाढत आहे. डायलेसिस किंवा किडनी प्रत्यारोपण यांसारखे उपचार त्यासाठी आवश्यक ठरतात. किडनी मिळवण्यासाठी प्रतीक्षा यादी दिवसेंदिवस वाढत आहे. ज्यांची आर्थिक क्षमता आहे, असे रूग्ण त्यासाठी वाटेल ती किंमत मोजायला तयार असतात आणि चार पैसे मिळतील म्हणून किडनी विकणारे गरीबही उपलब्ध असतात. पंधरा-वीस वर्षांपूर्वी रक्तदानाची संकल्पना रूजली नव्हती त्याकाळात नियमितपणे आपले रक्त विकणारे आढळत. तसाच प्रकार किडनी प्रत्यारोपणाच्या निमित्ताने दिसून येतो. मुंबईतल्या एल. एच. हिरानंदानी रूग्णालयामध्ये गेल्या १४ जुलै रोजी किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया होणार होती. एका रूग्णाला किडनीची आवश्यकता असताना, एका महिलेला त्याची तोतया पत्नी दाखवून प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली जाणार होती. अवयव प्रत्यारोपणासंबंधीच्या २०११ च्या सुधारित कायद्यानुसार रक्ताचे नाते असल्याखेरीज जिवंत व्यक्तीचे अवयव देता येत नाहीत. तरीही या रूग्णालयामध्ये रूग्णाकडून लाखो रूपये घेऊन बनावट कागदपत्रांच्या आधारे किडनी प्रत्यारोपण केले जाते. चार-दोन लाखांसाठी आपली किडनी विकणारे गरीब या जाळ्यात अलगद सापडतात. वर्षानुवर्षे हा काळा धंदा या रूग्णालयामध्ये चालू असताना हिरानंदानी समूहाचे संचालक आपण नामानिराळे असल्याचे सांगतात. त्यावर विश्वास तरी कोण ठेवणार? आपल्या रूग्णालयात असा काही प्रकार चालू असल्याचे आपल्या माहीत नव्हते. असेच ते म्हणत असतील, तर त्यांच्या निगरगट्टपणाचे कौतुकच करायला हवे! हिरानंदानी रूग्णालयामधील मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि चार डॉक्टर आणि इतर काही अशा चौदा जणांना या प्रकरणांत अटक झाली आहे. आपली किडनी विकूनही पैसे न मिळाल्याची तक्रार एकाने काँग्रेसच्या इंटक या कामगार संघटनेकडे केल्यामुळे हिरानंदानी रूग्णालयामध्ये चालू असलेल्या या काळ्या बाजाराचे भांडे फुटले!

दलालांची चलती!

जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार दरमहा तीन हजार रूग्ण किडनीच्या प्रतीक्षेत असतात. दररोज १३ जण किडनी न मिळाल्याने मृत्यु पावतात. दरवर्षी दहा हजार रूग्णांवर किडनी प्रत्यारोपण केले जाते. चीन, भारत, पाकिस्तानमधील काही रूग्णालयांत या शस्त्रक्रिया होत असल्याने इतर देशांतून या शस्त्रक्रिया करवून घेण्यासाठी रूग्ण येत असतात. एका किडनीसाठी २ लाख डॉलर एवढी जबर किंमत देण्यासही हे रूग्ण तयार असतात. गरीब आणि गरजू व्यक्ती पैशासाठी किडनी नाममात्र मोबदल्यात विकण्यास तयार होतात. याम सामील असलेले दलाल या व्यवहारात लाखो रूपयांची कमाई करतात. अपघातात जखमी होऊन ब्रेनडेंड झालेल्या रूग्णांचे अवयव वेळीच त्यांच्या नातलगांनी दान केले तर अवयवांचा होणारा चोरटा व्यापार थांबू शकतो. अनेक ठिकाणी रोजगार किंवा नोकरीसाठी भरती झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी विशिष्ट रूग्णालयामध्ये पाठवले जाते. तेथे त्यांचे किडनीसारखे अवयव त्यांच्या नकळत काढून घेतले जातात. भारतातील वेल्लीवक्कुम नावाचे गाव तर किडनी विक्रीसाठी एवढे प्रसिध्द झाले आहे की त्या गावाला किडनी वक्कुम असेच संबोधले जाते. अवयव प्रत्यारोपण आणि अवयव काढून घेण्याचा परवाना नसणाऱ्या रूग्णालयांची संख्या वाढवणे व किडनीदात्यांची संख्या वाढण्यासाठी जनजागृती करणे यासारख्या उपाययोजनांनीच किडनीचा काळाबाजार थांबवता येईल.

‘न्यायस्वातंत्र्य समता’ हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे,पुणे-४११०५८ येथे छापून सर्व्हे नं. ४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे - ४११०४८ येथून प्रकाशित केले.

(या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक / प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत). मो. ८५५४८९१२७९

# महाराष्ट्रातील सर्वात मोठा व आगळा-वेगळा सण म्हणजे गणेशोत्सव



महाराष्ट्रातील सर्वात मोठा व आगळावेगळा सण म्हणजे गणपती. या उत्सवाचे स्वरूप सार्वजनिक झाल्यापासून तर हा उत्सव महाराष्ट्रभर अत्यंत धामधुमीने साजरा केला जातो. हा उत्सव दहा दिवसांचा असतो. गणपती ही ज्ञानाची देवता. गजानन हा विघ्नहर्ता मानतात. त्यामुळे कोणत्याही शुभकार्याच्या सुरुवातीला गणपतीची पूजा करण्याचा प्रघात आहे. कोकणातील हा सर्वात महत्त्वाचा सण असल्यामुळे जगाच्या पाठीवर असलेला कोणताही कोकणी माणूस या उत्सवासाठी आपल्या गावी जाण्यास उत्सुक असतो. त्यामुळे कोकणात जाण्यासाठी खास बसेसची सोय केली जाते.

या सणाला शाडूच्या मातीच्या केलेल्या एकापेक्षा एक सरस अशा गणपतीच्या मूर्ती बाजारात येतात. त्यापैकी एक घरी आणली जाते. गणपती आणावयास जातेवेळी लोक बरोबर ताम्हण, रूमाल घेऊन जातात. गणपती आणतांना झाकून आणतात व गणपतीचे तोंड आपल्याकडे येईल असे पहातात. गणपती आणतेवेळी गणपतीपुढें काही नाणी व गोविंद विडा ठेवून गणपती घरी आणावा अशी पुष्कळ ठिकाणी पध्दत आहे. गणपती घरी आणल्यानंतर घराच्या दाराबाहेर गणपतीला तांदूळ व पाणी यांनी ओवाळून ते बाहेर टाकून देतात. नंतर गणपती आणणा-या व्यक्तिच्या पायावर गरम पाणी घालतात. गणपतीला व गणपती आणणा-या व्यक्तिला कुंकू लावतात, पाच सवाष्णीं गणपतीला औक्षण करतात. पाटावर तांदूळ पसरून त्यावर गणपती ठेवून गणपतीची स्थापना करतात. गणपती अथर्वशीर्षाची सहस्त्रावर्तने करतात. यथासांग पूजा व आरती करून सकाळचा कार्यक्रम संपवितात. रोज सकाळी व सायंकाळी पूजा-आरती करून, केळे-पेरू वगैरे खिरापत संध्याकाळी आरतीचे वेळी देतात. गणपतीच्या पूजेकरिता नारळ, एकवीस मण्यांचे वस्त्र, फुले-पत्री, शमी, दुर्वा, जानवे, गूळ-खोब-याचा नैवेद्य, केवडयाचे कणीस इ. साहित्य लागते. गणपतीची स्थापना करण्यापूर्वी सुपारीच्या गणपतीची स्थापना करून त्याची पूजा करण्यात येते.

या दिवशी मुख्यतः नारळ व गूळ यांच्या सारणाचे, तांदुळाच्या उकडीचे मोदक करतात.

सार्वजनिक गणपती उत्सवामधे गणेशाच्या भव्य मूर्ती चौकाचौकातून बसवितात व त्याची भव्य आरास करतात. लोक रात्रीच्या वेळी हे देखावे पहाण्यासाठी रस्तोरस्ती हिंडतात. संगीत, नृत्य, पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नाटके वगैरे करमणुकीचे कार्यक्रम आखले जातात.

सार्वजनिक गणपतींचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात. काही लोकांकडे दीड दिवसांचा गणपती असतो तर काही जणांकडे पाच दिवस असतो. तर काहीजणांचा गणपती गौरींबरोबर सातव्या दिवशी जातो.

गणपती विसर्जनाच्या दिवशी संध्याकाळी नेहेमीप्रमाणे गणपतीची पूजा करतात. गणपतीच्या हातांत गूळ-खोबरे व तिळाचा लाडू देऊन आरती करातात. ’गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ अशा गजरांत गणपती मूळच्या जागेवरून हलवून ताम्हणात ठेवतात. वरील पूजा सोवळयाने करतात. नंतर गणपतीचे तोंड घरातील दाराकडे करून गणपतीची पाठ आपल्याकडे करून गणपती विहीरीवर, तळयावर, नदीवर, समुद्रावर विसर्जनाकरीता नेतात. झांज घेऊन ’गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ असे म्हणत विसर्जनाच्या ठिकाणापर्यंत जातात. तिथे परत गणपतीची पूजा केली जाते. गणपतीला दुर्वा वाहतात, आरती करतात. यास उत्तरपूजा म्हणतात. विसर्जनाच्या वेळी गणपती दोन वेळा पाण्यातून बाहेर काढतात व तिस-या वेळी पाण्यात सोडतात.

नंतर नदीकाठची वाळू किंवा विहीरीजवळचे खडे आणून घरांत चारी बाजूला टाकतात. समज असा आहे की, चारी बाजूला वाळू किंवा खडे टाकले असतां जनावराची भिती नसते. गणपती जवळ टेवलेला नारळ नदीवर, विहीरीवर फोडावा. प्रसाद म्हणून खोबरे वाटतात. घरी आल्यावर सर्वांना प्रसाद व केलेली खिरापत देतात. काही ठिकाणी गणपती विसर्जनाच्यावेळी गणपतीच्या जागी तांब्याचा कलश व त्यावर नारळ ठेवतात. गणपतीच्या विसर्जनानंतर घरी आल्यावर त्या कलशाची नेहेमीप्रमाणे आरती, मंत्रपुष्प म्हणून सांगता करण्याची पध्दत आहे.




## पुण्यनगरीत आलेल्या सर्व गणेशभक्तांचे हार्दिक स्वागत !




● शुभेच्छुक ●

१) कला व क्रिडा गणेश मित्र मंडळ - संस्थापक रविंद्र आ. गोगावले
२) उदय मित्र मंडळ, महादेवनगर - अध्यक्ष मा. सुनिल नारायण घुले, उपाध्यक्ष : मा. कुलदिप यादव
३) अखिल महादेवनगर युवा मंच, संस्थापक : प्रशांत पंढरीनाथ घुले, अध्यक्ष : गणेश घुले
४) शिव प्रतिष्ठान मित्र मंडळ - अध्यक्ष अमोल वाघळकर, सागर धोंडीराम कांबळे
५) जय मल्हार कॉलनी मित्र मंडळ - आधारस्तंभ - अक्षय (भाऊ) जयप्रकाश घुले मनोज पांचाळ, सोनु जगताप
६) भैरवनाथ मित्र मंडळ - ढेरे बंगला कुदळे निवास
७) हनुमान मित्र मंडळ घुले वस्ती - अध्यक्ष राहुल शिंदे, उपाध्यक्ष स्वप्निल वसवे
८) समता दिप ज्योत मित्र मंडळ महादेवनगर - अध्यक्ष नरेंद्र बारवकर
९) श्री. विघ्नहर्ता महोत्सव विठ्ठलनगर तरुण मित्र मंडळ
१० श्री गजानन मित्र मंडळ, मंगलमुर्ती प्रतिष्ठाण विठ्ठलनगर १५ नंबर - अध्यक्ष अजित पवार
११) श्री गणेश मित्र मंडळ १५ नंबर चौक, संस्थापक विजय सोनार, अध्यक्ष सचिन बंडू मोरे, उपाध्यक्ष प्रताप उबाळे
१२) आप्पासाहेब मगर कॉलेज गणेश फेस्टीव्हल

## संक्रांत स्पेशल

### तिळाच्या मऊ वड्या



साहित्य : ४ वाट्या भाजलेली तिळाची भरडपूड, १ वाटी खवलेला नारळ, १ वाटी मावा, ४ वाट्या साखर, वेलची पावडर, १/२ टे. स्पून १ वाटी पाणी.

कृती : मावा भाजून ठेवा. तिळाचे कुटात खवलेले नारळ, मावा वेलची पावडर मिक्स करा. गॅसवर एका भांड्यात साखर व पाणी टाकून पाक तयार करा. सतत ढवळा, साखर विरघळल्यावर त्यात वरचे तिळाचे मिश्रण टाकून घोटा व गॅस बंद करून घोटत रहा. गोळा होऊ लागल्यावर एका तूप लावलेल्या ताटात पसरवा व वाटीने सारखे करून थंड झाल्यावर वड्या कापा.

### तिळाची पातळ पांढरी चिक्की

साहित्य : चार वाट्या पांढरे तीळ, तीन वाट्या साखर

कृती : कढईत साखर टाकून गॅसवर ठेवा. मंद आचेवर सतत ढवळा, थोड्या वेळाने साखरेचे पाणी होणार, पूर्ण साखरेचे पाणी झाल्यावर गॅस बंद करून त्यात तीळ टाका व सारखे हलवत रहा. गरम असतानाच तूप लावलेल्या ताटात पातळ पसरवा. चिक्की तयार आहे. ही चिक्की पटकन तयार होते व कडकपण राहते.

## ज्ञानेश्वरी



**तू प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा ।**
**मैत्रियेची चित्कळा । धनुर्धरा ।।**

भगवद्गीतेत श्रीकृष्ण व अर्जुन ह्यांच्यांतील प्रेम व जिव्हाळा यांचे किंचित असलेले दर्शन ज्ञानेश्वर विविध अंगांनी स्पष्ट करून सांगतात. देवी रुक्मिणी. सनकादिक महात्मे यांनी दीर्घ तपश्चर्या करूनही त्यांच्या इच्छा अर्जुनासारख्या सफल झाल्या नाहीत. श्रीकृष्णांना अर्जुनाचे एवढे प्रेम आहे की, त्याला दुसरी उपमाच नाही. या अर्जुनाच्या प्रेमभोगासाठी निराकार निर्गुण परमात्मा अर्जुनासाठी साकार व सगुण झाला. या अर्जुनाची प्रेमस्थिती काय वर्णन करावी ? प्रेमाशिवाय श्रीकृष्ण कोणाच्याही ध्यानात येत नाहीत. ते वेदांना समजत नाहीत आणि ध्यानानेही त्यांचे आकलन होत नाहीत. पण हा सच्चिदानंदरूप परमात्मा अखंड, अनादि , अचल असूनही अर्जुनाकडे कसा वळला आहे पहा. या अर्जुनाच्या प्रेमामुळे श्रीकृष्ण आपल्या निराकारत्वाची घडी अर्जुनापुढे उलगडून दाखवतात.

याप्रसंगी श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले की, हा कर्मयोग आम्ही पूर्वी विवस्वानाला सांगितला होता. हा योग पुढे सूर्य,मनू, इक्ष्वाकू अशा परंपरेने परिपुष्ट झाला. पण पुढे देहावर प्रेम जडल्यानंतर याकडे दुर्लक्ष झाले. मग दिगंबर लोकांच्या गावी वस्त्रांची काय जरूरी ? बहिऱ्याला गायनाचा काय उपयोग ?

या योगाचा क्रमवार इतिहास ऐकून अर्जुनाच्या मनात एक शंका आली ती अशी की, हा श्रीकृष्ण तर आपल्यासमोर दिसत आहे. मग याला एवढा जुना इतिहास कसा माहीत झाला? ही अर्जुनाच्या मनातील शंका ओळखूनच भगवंत म्हणाले, अर्जुना , हा नष्ट होत चाललेला योग तुझ्यापासून मी गुप्त ठेवू शकत नाही. कारण तू प्रेमाचा मूर्तिमंत पुतळा आहेस. भक्तीचा जिव्हाळा आहेस. सख्यभावातील चैतन्य आहेस. विश्वासू असा सांगाती आहेस, म्हणून युध्दप्रसंग बाजूस ठेवून अर्जुना, मी तुला हे कर्मयोगरहस्य सांगत आहे.

# शेतीपंपांसाठी बारा तास वीज; पावसाने ओढ दिल्यामुळे निर्णय

मुंबई: गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. शेतीला पाणी न मिळाल्यास हातातोंडाशी आलेली पिके कोमेजून जातील, अशा चिंतेच्या गर्तेत असणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुढील तीन महिने कृषिपंपांना आठ तासांऐवजी १२ तास वीज देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शेतकऱ्यांना या निर्णयाचा फायदा तीन महिने मिळणार असून त्यासाठी ५५० कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च येणार आहे, अशी माहिती ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सतत तीन वर्षांच्या दुष्काळानंतर यंदा पावसाने जोरदार सुरुवात केली होती. पावसाने दोन महिने जोरदार बॅटिंग केल्याने शेतकऱ्यांवरील दुष्काळाचे संकट दूर झाले होते. मात्र, मराठवाडा, विदर्भ यासह अन्य भागांमध्ये गेल्या २५ दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने हातची पिके जाऊन कोरडा दुष्काळ पडेल, अशी भीती निर्माण झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी तातडीची बैठक घेऊन स्थितीचा आढावा घेतला. उपलब्ध पाणी वापरून पिके तगवता यावीत यासाठी कृषिपंपांना सप्टेंबर ते नोव्हेंबर या दरम्यान दिवसा बारा तास वीज पुरवठा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. ऊर्जामंत्री बावनकुळे यांनी ही माहिती दिली. मात्र, हा वीज पुरवठा सरसकट न देता जो शेतकरी मागणी करेल त्यालाच देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत

मुख्यमंत्र्यांनी वीज चोरी रोखणे, सौरऊर्जेवर आधारित कृषी फिरडरचे विद्युतीकरण आदींचा आढावा घेतला.

वीज चोरी पकडण्यासाठी पोलीस ठाणी

राज्यभरातील शेतकऱ्यांकडे सुमारे १३ हजार कोटी रुपयांची वीजबिलांची थकबाकी असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. राज्यात वीज चोरीचे प्रमाण वाढले असून त्याला आळा घालण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात आणि ग्रामीण भागात पोलीस ठाणी स्थापन करण्यात येणार आहे. तेथे फक्त वीज चोरीच्या तक्रारी नोंदवून घेऊन संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. ही वीज चोरी पकडण्यासाठी भरारी पथके नेमण्यात येणार आहेत. त्यासाठी सुरक्षा मंडळातील कर्मचाऱ्यांबरोबरच स्थानिक पोलिसांचीही मदत घेणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. सध्या राज्यात विजेच्या तक्रारीसंदर्भात सहा पोलीस ठाणी आहेत.

सौरऊर्जेचे धोरण लवकरच

राज्यातील पारंपरिक वीजनिर्मितीवर येणार ताण आणि भविष्यातील विजेची मागणी लक्षात घेऊन राज्य सरकारने सौरऊर्जा निर्मितीवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून ७५०० मेगावॅट वीज निर्मिती करण्याचा सरकारचा विचार असून यामध्ये खासगी गुंतवणूदारांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे विजेचे दर कमी होणार असून त्यासाठी येत्या आठ दिवसांमध्ये या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांकडून देकारपत्रे मागविणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यापुढे कृषिपंप, उपसा जलसिंचन, नळ योजना आदी योजना सौरऊर्जेवरच चालणार आहेत, असे सांगतानाच जास्तीत जास्त वीज सौरऊर्जेवर तयार करण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


दरम्यान, संगमनेर तालुक्यातील कारजुले पठार आणि निमोण येथे प्रायोगिक तत्त्वावर सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत.

## कविता अजून बाकी आहे

मला अजून कविता जमलीच नाही
ज्या दिवशी ती जमेल,
ती कविता शेवटची असेल
कारण त्यांनतर लिहायची गरजच पडणार नाही
तेव्हा माझ्या आतला लाव्हा
बाहेर पडलेला असेल
त्या दिवसाची मी वाट पाहतोय
मला काहितरी सांगायच आहे,
दुसऱ्याला नाही, पण स्वतःलाच
पण संवादच होत नाहीये...
बहुतेक मी झोपेत लिहीत असेन,
नाहीतर तो झोपेत वाचत असेन,
मला वाटतय खरी जाग
अजुन आलेलीच नाही
सकाळ अजून व्हायची आहे
मी गाढ निद्रेत आहे
माझी कविता अजून बाकी आहे,
कारण मला अजून जाग आलेली नाही
मी चाचपडतो आहे, म्हणून मला
सांत्वन नका देऊ
मी तर जागणार एक दिवस,
कारण मी झोपेत आहे, हे मला माहित आहे
तुम्ही किती दिवस झोपेच सोंग करणार..?

- नितीन सोनवणे, मोबा.: ९८६०७९०२३३

## चाणक्य नीती



काळ हा सर्वांत जास्त बलवान आहे. तो प्राण्यांना खाऊन टाकतो. प्रजा नाहीशी करतो. जरी सर्व काही नाहीसे झाले तरी काळ उरतोच. तो सदैव जागा असतो.

प्रवासाचे वेगळेच महत्त्व आहे. प्रवास करणाऱ्याचे ज्ञान वाढते. ही सारी दुनिया म्हणजे एक विद्यापीठ मानले गेले आहे, म्हणून माणसाने सतत प्रवास केला पाहिजे.

हिंडत राहणारा राजा पूजनीय होतो. हिंडत राहणारा ब्राह्मणही थोर समजला जातो. हिंडणारा योगी पुरूषही आदरणीय आहे. पण भटकत राहणारी स्त्री मात्र कधीही पवित्र राहू शकणार नाही.

आंधळे चार प्रकारचे आहेत. एक जन्मांध, दुसरा कामवासनेने आंधळा झालेला, तिसरा स्वतःला फार मोठा समजणारा, चौथा हावरा माणूस . या आंधळ्यांना दुसरे काही सुचतच नाही.

## ज्ञान गंगा

### तुळशीचे विविध औषधी गुण



जर आपण घरातच तुळशीचे रोप लावून ते वाढवले, तर त्यापासून अनेक आजारांवर उपचार होऊ शकतात.

१) चहा करताना त्यासोबत तुळशीची पाने उकळली, तर असा चहा घेतल्यामुळे सर्दी, ताप व स्नायुदुखी नाहिशी करता येते.

२) १० ग्रॅम तुळशीच्या रसात ५ ग्र ॅम मध घालून प्याल्यास उचकी व दमा शमवता येतो.

३) तुळशीच्या रसाच्या काही थेंबात थोडेसे मीठ मिसळून बेशुध्द पडलेल्या व्यक्तीच्या नाकात सोडल्यास ती व्यक्ती त्वरित शुध्दीवर येते.

४) जर तुळशीची ११ पाने ४ काळ्या मिऱ्यांसोबत नियमित खाल्ली तर मलेरिया बरा होऊ शकतो.

५) रोज सकाळी रिकाम्या पोटी २-३ चमचे तुळशीचा रस प्याला, तर शारीरिक बळ व स्मरणशक्ती वाढते तसेच व्यक्तिमत्त्वही प्रभावी होते.

६) तुळशीमध्ये रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण नियंत्रित राखण्याची क्षमता असते.

७) शरीराचे वजन नियंत्रित ठेवण्यासाठीही तुळस अत्यंत गुणकारी असते. ती नियमित खाल्ल्यास स्थूल व्यक्तीचे वजन घटते, तर दुबळ्या व्यक्तीचे वजन वाढते अर्थातच तुळस शरीराचे वजन प्रमाणबध्द रूपात नियंत्रित ठेवते.

## हास्यविनोद

मित्र - माझी गाय सुका चारा खात नाही. फक्त हिरवा चारा खाते! हिरवा चारा आज मिळत नाही, त्यामुळे गाय बरीच खराब झाली. मला समजत नाही, की मी काय करू ?

दुसरा मित्र - गाईच्या डोळ्याला हिरव्या रंगाचा चष्मा लावून टाक म्हणजे गाईला सुका चारा हिरवा दिसले आणि ती खाऊ लागेल.

# बलात्कार, खून प्रकरणातील दोषींना पॅरोल नाही; राज्यात लवकरच नवी नियमावली

मुंबई : बलात्कार, खून, अपहरण, अशा गंभीर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली असून असे गुन्हे करणाऱ्यांच्या बाबतीत कठोर धोरण स्वीकारण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. अशा प्रकरणांमधील दोषींना कायद्याचा धाक बसावा यासाठी बलात्कार व खून प्रकरणात तुरुंगवासाची शिक्षा भोगणाऱ्या गुन्हेगारांना यापुढे पॅरोल मंजूर न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याबाबत लवकरच शासन निर्णय जारी केला जाणार आहे.

वडाळ्याच्या भक्ती पार्कमध्ये राहणाऱ्या ॲड. पल्लवी पूरकायस्थ यांचा ऑगस्ट २०१२ मध्ये सज्ञाद मुघल याने अत्यंत क्रूर पद्धतीने खून केला होता. या खुनाविरोधात समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर सरकारने हा खटला जलदगती न्यायालयात चालविला. या प्रकरणात न्यायालयाने सज्ञादला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आणि त्याला नाशिक कारागृहात पाठवले. सज्ञादने यावर्षी फेब्रुवारी महिन्यात पॅरोलसाठी अर्ज केला होता. विभागीय आयुक्तांनी त्याचा पॅरोल मंजूर केल्यानंतर तो एप्रिलच्या अखेरीस तीस दिवसांसाठी बाहेर आला होता; पण त्यानंतर तो तुरुंगात परतलाच नाही. पॅरोलवर सुटल्यावर फरार होणारा हा काही पहिला कैदी नाही तर आतापर्यंत तब्बल २०० कैदी पॅरोलवर सुटल्यावर फरार झाले आहेत. त्यामुळे पॅरोलबाबत कठोर नियमावली करण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. बलात्कार प्रकरणात शिक्षा भोगणाऱ्या आरोपींना पॅरोल न देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एवढेच नव्हे तर खून, दरोडा, लहान मुलांचे अपहरण, दहशतवाद आणि अंमली पदार्थांच्या तस्करी प्रकरणी शिक्षा सुनावलेल्या आरोपींनाही यापुढे पॅरोलवर सोडले जाणार नाही. या संदर्भात गृह विभागाने विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला असून लवकरच परिपत्रक जारी केले जाणार आहे.

फर्लो, पॅरोलची सुट्टी कमी करणार

कैद्याच्या जवळचा नातेवाईक आजारी असेल किंवा मृत्यू झाल्यावर पॅरोल रजा मंजूर होते. अशा वेळी किमान ३० दिवसांची पॅरोल रजा देतात. ती जास्तीत जास्त ९० दिवस देता येते तर तुरुंगात चांगली वर्तणूक असलेल्या कैद्यांना कुटुंबीयांना भेटण्यासाठी २८ दिवसांची सुट्टी, म्हणजेच ङ्गफर्लोफ दिला जातो.

शिक्षेच्या २२ महिन्यांच्या कालावधीनंतर आरोपीला २८ दिवसांची संचित रजा मिळते; परंतु सरकारने फर्लो व पॅरोल रजांच्या सुट्टीचा कालावधी कमी केला आहे. पॅरोल ९० दिवसांवरून ४५ दिवस तर फर्लो रजा २८ ऐवजी २१ दिवसांची करण्याचा निर्णय घेतला आहे.

# पुणे महापालिका निवडणुकीसाठी ४१ प्रभाग नगरसेवकांची संख्या १६२ होणार



पुणे : महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी ४१ प्रभागांची प्रारूप रचना महापालिका प्रशासनाकडून तयार करण्यात आली आहे. या प्रारूप रचनेमध्ये ४ सदस्यांचे ३९ प्रभाग, तर ३ सदस्यांचे २ प्रभाग अशी विभागणी आहे. त्यामुळे फेब्रुवारी २०१७ मध्ये निवडून येणाऱ्या नगरसेवकांच्या संख्येत १० ने वाढ होऊन नगरसेवकांची संख्या १६२ होईल.

महापालिकेची निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून त्यासाठीचा कार्यक्रमही जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार महापालिकेच्या निवडणूक शाखेकडून प्रभागांची प्रारूप रचना ७ सप्टेंबपर्यंत विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या त्रिस्तरीय समितीला सादर करण्यात येणार आहे. महापालिकेची सदस्य संख्या विचारात घेऊन शक्य तेथे चार सदस्यीय प्रभाग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. चार सदस्यांचा प्रभाग होत नसेल तर एक प्रभाग तीन किंवा पाच सदस्यांचा किंवा दोन प्रभाग तीन सदस्यांचे करण्याच्या सूचना आयोगाकडून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार ही प्रारूप रचना महापालिका प्रशासनाकडून तयार करण्यात आली आहे. प्रारूप रचनेचा हा आराखडा बुधवारी (७ सप्टेंबर) त्रिस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहे. त्यामध्ये दुरुस्ती करून १२ सप्टेंबपर्यंत तो निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येणार आहे. २३ ऑक्टोबपर्यंत त्याला निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळण्याची शक्यता असून ७ ऑक्टोबर रोजी आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. प्रभागाच्या प्रारूप रचनेनुसार नगरसेवकांची संख्याही १० ने वाढणार आहे. सध्या महापालिकेमध्ये १५२ नगरसेवक आहेत. प्रारूप प्रभागानुसार ती १६२ होणार आहे. प्रारूप प्रभाग रचना करताना भौगोलिक सीमा लक्षात घेण्यात आल्या आहेत. प्रभाग रचनेला उत्तर दिशेकडून सुरुवात होणार आहे. उत्तर, पूर्व, पश्चिम आणि दक्षिण दिशेनुसार ही रचना करण्यात येणार आहे.

# पाकला एकाकी पाडा, निर्बंध घाला : नरेंद्र मोदी



व्हिएनतियान : आमचा एक शेजारी देश दहशतवाद निर्माण करून त्याची निर्यात करतोय, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी पाकवर पुन्हा हल्ला चढवला.अशा चिथावणीखोर देशाला एकाकी पाडण्यात यावे आणि त्याच्यावर निर्बंध आणावेत असे आवाहनही मोदी यांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला केले. आमच्या शेजारी असलेल्या एका देशाचे वैशिष्ट्य म्हणजे, दहशतवाद जन्माला घालून त्याची निर्यात करणे, असे ते पाकचा थेट उल्लेख न करता म्हणाले. मोदी येथे भरलेल्या पूर्व आशिया शिखर परिषदेत बोलत होते. ते म्हणाले, दहशतवादाच्या या निर्यातीमुळे शांततेसाठीची जागा घटत असून, हिंसाचारासाठी मात्र वाढत आहे. पर्यायाने सगळ्यांचीच शांतता व समृद्धी धोक्यात आली आहे. या वेळी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग उपस्थित होते. चारच दिवसांपूर्वी मोदी यांनी ब्रिक्स देशांच्या परिषदेत सदस्य देशांना दहशतवादाविरोधात लढण्यासाठी संयुक्त प्रयतक करण्याचे आवाहन केले होते.

ओबामा-द्युतेर्ते भेट

बराक ओबामा यांच्याबद्दल फिलिपाइन्सचे अध्यक्ष रॉड्रिगो द्युतेर्ते यांनी आक्षेपार्ह शेरेबाजी केल्यानंतरही उभयतांची बुधवारी भोजनापूर्वी अनौपचारिक भेट झाल्याचे फिलिपाइन्सच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. आक्षेपार्ह विधानानंतर ओबामा यांनी द्युतेर्ते यांच्याशी मंगळवारी ठरलेली नियोजित भेट रद्द केली होती.

मोदी यांनी गुरुवारी चीनचे पंतप्रधान ली केकियांग यांची भेट घेतली. त्याआधी त्यांची हँगझोऊ येथे चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी भेट झाली होती. मोदींनी लाओशियन पंतप्रधान थोंगलाऊन सिसोलिथ आणि दक्षिण कोरियाचे अध्यक्ष पार्क ग्युऊन-हाये यांचीही भेट घेतली होती. बुधवारी रात्री मोदी व बराक ओबामा यांचीही भेट झाली. मोदी आणि बराक ओबामा यांची यावेळी भेट झाली. गेल्या दोन वर्षांमध्ये झालेली या दोघांची ही आठवी भेट होती. अमेरिकेचा भारताच्या एनएसजी सदस्यत्वासाठी पाठिंबा असेल असे ते म्हणाले.

# भारतीय भूमि भूकंपामुळे दरवर्षी पाच सें. मी. वायव्य दिशेकडे सरकते : वाय. एस. चौधरी

नवी दिल्ली : भारतीय भूमि (प्लेट) भूकंपामुळे दरवर्षी पाच से.मी. वायव्य दिशेकडे सरकत आहे. या नैसर्गिकरित्या सरकणाऱ्या प्रक्रियेची नोंद जीपीएसच्या सहाय्याने केली जाते. यासह सर्व बाबींचा बारकाईने अभ्यास केला जात असल्याचे माहिती, विज्ञान आणि तंत्रज्ञान तथा पृथ्वी विज्ञान राज्य मंत्री वाय.एस. चौधरी यांनी दिली.

पावसाळी या अधिवेशन काळात भंडारा-गोंदिया मतदारसंघाचे खासदार नाना पटोले यांनी भौगोलिक क्षेत्राशी संबंधित अतिशय महत्वपूर्ण प्रश्न विचारला. यावर केंद्रीय मंत्रालयाने लेखी उत्तरात ही माहिती दिली आहे.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने याबाबतचे स्पष्टीकरण देताना सांगितले, भारतीय प्लेट ही युरेशियन प्लेट्सना घर्षित करते. त्यांच्या या घर्षणामुळे दोन प्लेट्स वरखाली होतात आणि त्यामुळे हिमालय पर्वत रांगेत भूकंप येतो. यामुळेच भारतीय भूमी दरवर्षी ५ से.मी. वायव्यच्या दिशेने सरकत आहे.

जमिनीच्या आत होणाऱ्या या भूकंपापासून संरक्षणासाठी भारतीय मानक ब्यूरोने ठरविलेल्या मापदंडाचे पालन करून निर्माणाधीन बांधकामात भूकंप विरोधी रचना करणे तसेच अस्तित्वात असणाऱ्या इमारतींमध्ये रिट्रोफिटिंगचा उपयोग करण्याचे निर्देशित केलेले आहे. त्याप्रमाणे जनसामान्यांमध्ये तसेच भूकंप प्रवण क्षेत्रात भूकंप विरोधी रचनेचा उपयोग करण्याबाबत केंद्रीय पृथ्वी विज्ञान विभागाकडून जागरूकता निर्माण करण्यात येत आहे.

भूकंपापासून होणारे नुकसान थांबविण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गृह मंत्रालय, पृथ्वी विज्ञान मंत्रालय यासह सर्व राज्यातील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सामान्य नागरिकांमध्ये, शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीचे काम करते. याशिवाय राष्ट्रीय आपत्ती प्रतिक्रिया बळदेखील नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्ती रोखण्याचा प्रयन्त करीत आहे.

बाजारात, शाळामध्ये, रुग्णालयात, रेल्वे स्थानक, विमानतळ अशा अनेक महत्वाच्या ठिकाणी आपत्तीच्या काळात कशा पद्धतीने बचाव केला जावा, यासाठी मॉक ड्रिलव्दारे प्रशिक्षणातून जनजागृती केली जाते.

**पत्रकारिता प्रशिक्षणासाठी संपर्क साधा :**

**सा. न्यायस्वातंत्र्य समता**

परमार ट्रेड सेंटर, एफ २, साधु वासवानी चौक, पुणे - ४११ ००१

**मोबा. : ८५५४८९१२७९**

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क साधा !**

१) वैभव विलास बळवंतकर - पिंपरी - ९१३९६१३८०५
२) सुधीर दिवाकर माने - सहसंपादक - ७२७६१३१८५८
३) शरद गुलाब गायकवाड - ताडीवाला रोड - ९८२२४७६४८३
४) विजय के. खरात - ताथवडे - ८३९०३४७८५३
५) राकेश वसंतराव पगारे - चिंचवड - ९६८९११५०६४
६) आदित्य धम्मरक्षक - पुणे मनपा प्रतिनिधी - ९५७९१५०७२७
७) सौ. आशालता महाजन - पिंपळे गुरव - ९४२२५५८१०८
८) क्षितीज गौतम खरात - वडगाव शेरी - ९१५८७६०३९५
९) स्वप्निल धनराज ठाकरे - हडपसर - ८३०८३०१३०७
१०) युसूफ शेख - कोंढवा, कात्रज - ९५४५२८७३३७
११) दिगंबर गायकवाड - बिबवेवाडी - ८७९६०२११४७
१२) रितेश बी. आवळेकर - ८०८७९२९९४७
१३) गणेश भिमराव मगर - माळवाडी - ९५२७६८१९७२
१४) गौरव अशोक इंगुले -(कसबा पेठ)-९०२८४८२२५९ / ९८५००६७४५२
१५) रामेश्वर अर्जुन रच्चा - भवानीपेठ - ९६७३०१४३०३